जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८७७ दिनांक - १६/१२/२०२३**

सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

## नितीन दत्तात्रय रणझुंजार (टोळी प्रमुख)व त्याचे इतर दोन साथीदार यांचेवर मकोका कारवाई

दिनांक २८/११/२०२३ रोजी फिर्यादी यांचे अंबाईमाता मंदीराजवळ धायरी पुणे येथील दुचाकी व चारचाकी वाहनाचे गॅरेज व वॉशिंग सेंटर असुन त्याठिकाणी असलेल्या बिल्डींग बांधकामाच्या वादातुन टोळी प्रमुख आरोपी नामे नितीन दत्तात्रय रणझुंजार व त्याचे टोळीतील त्याचे साथीदार नामे १. किरण युवराज भिलारे वय २१ वर्षे, रा.सई बिल्डींगच्या मागे, प्लॉट नं.०१, जय महाराष्ट्र मंडळ चव्हाटा, मारुती मंदिराजवळ, धायरी पुणे व २.हर्षद नामदेव खोमणे, वय २३ वर्षे, रा. भैरवनाथ मंदीरामागे,नाईक आळी,नं ३६ धायरी, पुणे यांनी दुचाकी वरुन येवुन गॅरेजमध्ये घुसुन तेथे असलेल्या वॉचमनला धारदार हत्याराने जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व त्यांचे कुटुंबास धारदार हत्याराचा धाक दाखवुन गॅरेजच्या शेड मध्ये लावलेल्या सहा दुचाकी वाहनांना व चार चारचाकी वाहनाना पेट्रोल ओतुन आग लावुन गॅरेज परिसरात पार्क केलेल्या इतर सहा वाहनांचे काचा फोडुन नुकसान केले. तसेच गॅरेजच्या ऑफिसची काच फोडुन आत मध्ये प्रवेश करुन सर्व सामानाची तोडफोड करुन टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेला एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल व एक टॅब तसेच ड्रॉवर मध्ये ठेवलेले ४ हजार रुपये आणि टेबलावरील एक सीपीयु ची जबरी चोरी करुन हातातील धारदार शस्त्र हवेत फिरवुन मी एक मर्डर करुन जेलमधुन बाहेर आलो आहे, असे म्हणुन परीसरात दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. **५८१/२०२३ भादवि कलम ३९७,४३५,५०६(२),३४ क्रिमीनल अमेन्टमेंट ॲक्ट कलम ७, आर्म ॲक्ट कलम ४(२५) सह मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

दाखल गुन्ह्याचा तपासादरम्यान आरोपी नामे १)**नितीन दत्तात्रय रणझुंजार,वय ३३ वर्षे, रा.२७८,नाईक आळी,भैरवनाथ मंदिराजवळ,धायरीगाव,पुणे (टोळी प्रमुख) २) किरण युवराज भिलारे वय २१ वर्षे, रा.सई बिल्डींगच्या मागे, प्लॉट नं.०१,मारुती मंदिराजवळ, धायरी पुणे व ३)हर्षद नामदेव खोमणे,वय २३ वर्षे,रा.भैरवनाथ मंदीरामागे,नाईक आळी,धायरी, पुणे** यांना अटक करण्यात आली असुन सध्या जेलमध्ये आहेत.

नमुद आरोपी नितीन दत्तात्रय रणझुंजार,वय ३३ वर्षे,रा.२७८,नाईक आळी,भैरवनाथ मंदिरा जवळ,धायरीगाव,पुणे (टोळी प्रमुख) याने स्वतःचे तसेच टोळीचे वर्चस्व निर्माण व्हावे व अवैध मार्गाने इतर फायदा व्हावा म्हणुन संयुक्तपणे संघटीत गुन्हेगारी कृत्य करणार गट तयार केला. असुन टोळी प्रमुख याचेवर मागील १० वर्षामध्ये खुन, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याचा प्रयत्नासहित जबरी चोरी किंवा दरोडा, जबरी चोरी, बलाद्ग्रहण करण्यासाठी क्षती पोहाचविण्याची भिती घालणे, किंवा भिती घालण्याचा प्रयत्न करणे, मालमत्तेचे नुकसान करण्याच्या उद्देशाने स्फोटक पदार्थाने आग लावणे अशा प्रकारचे गंभिर गुन्हे केले आहेत,टोळी प्रमुख याने आपले वर्चस्व सिंहगड रोड, दत्तवाडी पोलीस स्टेशन या परिसरामध्ये प्रस्थपित व्हावे, दहशत निर्माण व्हावी व आर्थिक फायदा व्हावा यासाठी आपल्या संघटीत टोळीच्या वतीने एकटयाने व टोळीतील सदस्यांनी संयुक्तपणे दहशत पसरवून ते आपली चेनबाजी, शोकबाजी करीत आहेत.

त्याच्या टोळीच्या अशा कृत्यामुळे सदर परिसरात सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली आहे. त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गंभिर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांनी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वताःचे टोळीचे फायदयासाठी प्रस्तुत गुन्हा केला असल्याचे दिसुन आलेने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) चा अंतर्भाव होण्यासाठी सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अभय महाजन व पोलीस निरीक्षक,गुन्हे श्री.जयंत राजुरकर यांनी मा.पोलीस उप आयुक्त परि ३, पुणे शहर श्री.सुहेल शर्मा,यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे श्री. प्रविणकुमार पाटील, यांना सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५८१/२०२३ भादवि कलम ३९७,४३५,५०६(२),३४ क्रिमीनल अमेन्टमेंट ॲक्ट कलम ७, आर्म ॲक्ट कलम ४(२५) सह मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(४) चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे श्री. प्रविणकुमार पाटील, यांनी मान्यता दिलेली आहे.

दाखल गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त सिंहगड रोड विभाग पुणे श्री अप्पासाहेब शेवाळे,हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे,(पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार)श्री.रामनाथ पोकळे मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परि.३,पुणे शहर, श्री. सुहेल शर्मा, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, पुणे शहर श्री. अप्पासाहेब शेवाळे, यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे श्री.अभय महाजन,पोलीस निरीक्षक (गुन्हे) जयंत राजुरकर,यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि प्रविण जाधव यांचेसह सर्व्हेलन्स पथकाचे पोउनि गणेश मोकाशी, स्मित चव्हाण, प्रथमेश गुरव यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईन लक्ष देवुन,शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही १०१ वी कारवाई आहे.**